नोंदणी क्र. ए.जी.डी. / १६/७४
एफ ८१ जालना.

# मत्स्योदरी शिक्षण संस्था, जालना

सिरसवाडी नाका, रेल्वे ओव्हर ब्रिजच्या बाजूला, सर्व्हे नं. ४८८ / २९, जालना - ४३१ २०३ फोन : (०२४८२) २२५३३६

| | | |
|---|---|---|
| प्रा. सुरेंद्र पडगलवार<br>प्रशासकीय अधिकारी | मा. ना. राजेश टोपे (बी. ई.)<br>सचिव | मा. ॲड. अंकुशराव टोपे (मा. खासदार)<br>अध्यक्ष |

जा. क्र. म. शि.सं. जा./२००१ -२००2/214-2. दिनांक : 24/ 7 /२००1.

(शासन निर्णय शालेय विभाग क्र. पीआरई 2002 / 3395 / प्रशि-1 दिनांक 27/02/2003)
शिक्षण सेवक योजने अंतर्गत शिक्षण सेवक म्हणून नियुक्त करावयाच्या उमेदवारास द्यावयाचे

## नियुक्ती पत्र

जा.क्र.
दिनांक :-

प्रति,
~~श्री~~ / श्रीमती आफरिन बानो गुलाम नासेर.
मु.पो. ता. परतुर जि. जालना.

1. आपणास कळविण्यात येते की, प्राथमिक शाळेमध्ये शिक्षण सेवक नियुक्त करावयाच्या योजने अंतर्गत आपली शिक्षण सेवक म्हणून नियुक्ती करण्यासाठी निवड करण्यात आली आहे.
2. शिक्षण सेवक म्हणून आपली नियुक्ती खालील अटी व शर्ती च्या आधिन असेल त्या अटी व शर्ती मान्य असल्यास बाबत विहित नमुन्यातील हमीपत्र आपण लिहुन दिल्यानंतर आपणास शिक्षण सेवक म्हणून नियुक्ती दिली जाईल.

अ. शिक्षण सेवक म्हणून आपणास संस्थेतील कोणत्याही प्राथमिक शाळेत काम करावे लागेल.

ब. नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरुपाची गैरवर्तणूक केल्यास आपली नियुक्ती रद्द करण्याविरुध्द आपणास प्राधिकृत समितीकडे अपिल करता येईल.

क. नियमितं स्वरुपात नियुक्त केलेल्या प्राथमिक शिक्षकांच्या किंवा शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक लाभ आपणास देय असणार नाहीत.

ड. शिक्षण सेवक पदावर तीन वर्षे समाधानकारक काम केल्यानंतर आपणास प्राथमिक शिक्षकाच्या नियमित पदावर नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती देण्यात पात्र समजण्यात येईल. आपण शिक्षण सेवक म्हणून केलेली सेवा निवृत्तीवेतन व सेवा निवृत्तीनंतरचे देय फायदे यासाठी ग्राह्य धरली जाईल.

ई. आपणास नियुक्ती पत्र दिल्याच्या दिनांकापासून 15 दिवसात नियुक्तीच्या जागी रुजु होणे आवश्यक राहिल. कोणत्याही परीस्थितीत ही मुदत वाढवून दिली जाणार नाही. आपण रुजू झाल्यानंतर अन्य जिल्ह्यातील नियुक्तीसाठी आपला विचार करण्यात येणार नाही.

# मत्स्योदरी शिक्षण संस्था, जालना

सिरसवाडी नाका, रेल्वे ओव्हर ब्रिजच्या बाजूला, सर्व्हे नं. ४८८ / २९, जालना - ४३१ २०३ फोन : (०२४८२) २२५३३६

प्रा. सुरेंद्र पडगलवार
प्रशासकीय अधिकारी

मा. ना. राजेश टोपे (बी. ई.)
सचिव

मा. ॲड. अंकुशराव टोपे (मा. खासदार)
अध्यक्ष

जा. क्र. म. शि.सं. जा./२०० -२०० दिनांक : / / २००

फ. आपणास शिक्षण सेवक म्हणून दरमहा रु. 1500/- किंवा 3000/- मानधन दिले जाईल.

ग. नियुक्तीच्या कालावधीत आपणास खालील कर्तव्ये पार पाडावी लागतील.

- संबंधीत गावातील शाळेत जाण्यायोग्य वयाच्या सर्व मुलांना शाळेमध्ये दाखल करुन घेण्याच्या तसेच विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती टिकविण्याच्या दृष्टीने पालकांशी संपर्क ठेवणे.
- शाळेमध्ये दररोज संपुर्ण शालेय कालावधीमध्ये नियमित व वेळेवर उपस्थित राहणे.
- अभ्यासक्रमामध्ये नमुद केल्याप्रमाणे आवश्यक ते शैक्षणिक साहित्य निर्माण करणे.
- नेमून दिलेल्या वर्गाचे विहीत कार्यपध्दतीनुसार अध्यापन करणे.
- शासनाने आवश्यक केलेल्या प्रशिक्षणास उपस्थित राहणे.
- शाळेचे मुख्याध्यापक व केंद्र प्रमुख व शिक्षविस्तार अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली काम करणे व शैक्षणिक बाबीबाबत त्यांच्या आदेशाचे पालन करणे.
- वर्गातील विद्यार्थ्यांचे सातत्यपुर्ण व सर्वंकष मुल्यमापन करणे.
- शैक्षणिक व इतर उपक्रमाच्या आयोजनामध्ये सहभागी होणे.
- हि नियुक्ती आपल्या शैक्षणिक व व्यवसायीक अर्हतेच्या आणि लागु असलेल्या जाती प्रमाणपत्र पडताळणीच्या आधीन राहील.
- आपली नियुक्ती उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपिठ येथे दाखल असलेल्या रिट याचीका क्रं. 3381 / 2000 मधील अंतीम निर्णयाच्या अधीन राहील.

आपला

~~नियुक्ती प्राधिकारी~~ अध्यक्ष
मत्स्योदरी शिक्षण संस्था,
जालना.

नोंदणी क्र. ए.जी.डी./१६/७४
एफ ८१ जालना.

# मत्स्योदरी शिक्षण संस्था, जालना.

सिरसवाडी नाका, रेल्वे ओव्हर ब्रिजच्या बाजूला, सर्व्हे नं. ४८८ / २९, जालना - ४३१ २०३ फोन : (०२४८२) २२५३३६

डॉ. सुरेश संदीकर (एम.एस्सी., पीएच.डी. एफपीएसआय. एफआयएसएसटी) प्रशासकीय अधिकारी | मा. ना. राजेश टोपे (बी.ई.) सचिव | मा. ॲड. अंकुशराव टोपे (मा. खासदार) अध्यक्ष

क्र.म.शि.सं.जा./२००4 - २००5/394.

दिनांक : 10 /12 / २००4.

सुचि ड नियम 2 (5)

## नेमणुकीचे आज्ञापत्रक

श्री/श्रीमती आफरीन बानो गुलाम नौसेर, मु.पो.ता. परतुर, जि. जालना.

1) आपला अर्ज दि.30/ 4 /2004 संदर्भानुसार मी आपणास कळवितो की, आपली **सहशिक्षक** या हुद्यावर वेतनश्रेणी **रु. 4500-125-7000** नोकरीत रुजु व्हाल त्या दिनांकापासून नेमणूक करण्यात आलेली आहे. आपण भत्ते घेण्यास जसे स्थानिक महागाई भत्ता वेळोवेळी सरकार विहीत करील त्या दिनांकापासुन आपण पात्र राहाल.

2) आपली नेमणूक पुर्णपणे कायम सेवासातत्य / ~~तात्पुरती~~ दि.23/07/2004 पासून दि.— / —/200 पर्यंत चाचणी दाखल (प्रोबेशनल) (कायम) करण्यात येत आहे.

3) तात्पुरती नेमणूक असल्यास वर नमुद केल्याप्रमाणे आपली नेमणूक कालावधी संपताच नोटीसाशिवाय संपुष्टात येईल.

4) आपणास दि.23/07/2004 पासून पुढे सेवेत सातत्य देण्यात येत आहे.

ब) आपल्या नोकरीत शर्ती आणि सेवेच्या अटी महाराष्ट्र खाजगी शाळेचे (सेवेच्या ) अटी नियमानुसार अधिनियमानुसार 1977 आणि त्या खालील त्या नियमास नमुद केल्याप्रमाणे राहील.

5) आपणास जिल्हा व शल्य चिकीत्सक अधिकारी, सामान्य रुग्णालय, जालना यांच्या कडून वैद्यकिय तपासणी पदावर रुजु झाल्या पासून 3 महिन्यात करुन घ्यावी लागेल. ज्या डॉक्टराचे नांव वर नमुद केले आहे. त्यांच्याकडून क्षमतेचे प्रमाणपत्र मिळेपर्यंत आपली नेमणूक शर्तीवर राहील.

6) आपणास विनंती की, नेमणूकीच्या आज्ञापत्रांची पोच नेमणूक स्विकारल्याबद्दल मिळाल्या दिवसापासून सात (7) दिवसात आपणास द्यावी.

7) परिच्छेद (5) मध्ये नमुद केलेला कालावधीत नेमणूक स्वीकारल्याचे उत्तर न आल्यास ही आज्ञा रद्द केल्याचे समजले जाईल.

8) मा. शिक्षणाधिकारी(प्रा.) जिल्हा परीषद, जालना यांनी आपली नियुक्ती (द) मान्यता मिळाल्यानंतरच आपल्यास वेतन देण्यात येईल.

अध्यक्ष
मत्स्योदरी शिक्षण संस्था,
जालना.

प्रत माहीतीस्तव :

1) मुख्याध्यापक, मत्स्योदरी उर्दू प्रा. शाळा कुंभारपिंपळगाव, ता. घनसावंगी, जि. जालना

2) मा. शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद, जालना.

3) स्थळप्रत